**शिव शंकरा**

तुझ्या शिरी भागीरथी झुळझुळे
तुझ्या पायी लागता अंग भिजले ||१||

तुझ्या भाळी चंद्रकोर झळाळे
पाहता ती माझे चित्त उजळे ||२||

तुझ्या लोचनात करुणा उसळे
येऊन ती माझ्या अंतरी मिसळे ||३||

तुझ्या चारू अधरी जे स्मित झळे
पाहून ते हर्ष मम रोमी फुले ||४||

तुझ्या गळा शेष नाग सळसळे
वाटेना भय ते उलट दूर पळे ||५||

तुझ्या वरद हस्ते मनःशांती मिळे
तुझे नाम घेता जीवन धन्य झाले ||६||

– नारायण
०८/१४/२३